# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळांबाबत**

**(१) ६५१२५ (१६-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील सुमार दर्जाचे शिक्षण, ढासळती शैक्षणिक व्यवस्था, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव यासारख्या त्रुटीत सुधारणा न करता सुर्यनमस्कार व योगा बंधनकारक करुन शाळा बंद करण्याचा प्रशासनाकडून प्रयत्न होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षभरापासुन ६४ शाळांना प्रशासनाने टाळे लावल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ८ माध्यमाच्या ११९५ शाळा चालविल्या जातात. या व्यतिरिक्त खाजगी अनुदानित ४१८ शाळा असून, ६७३ विनाअनुदानित शाळा आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शैक्षणिक व्यवस्था व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम करण्यात येते. तसेच, महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये शासनाच्या गुणवत्ताविषयक सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते.

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमार्फत शाळांना भेटी देऊन शाळांच्या कामाचा आढावा घेण्यात येतो. तसेच, गुणवत्तेच्या दृष्टीने वरिष्ठांचे व तज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाते.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सुर्यनमस्कार व योगा यासाठी कोणतीही सक्ती करण्यात येत नाही.

(३) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई शहरातील जे.जे. मार्गावरील खड्ड्यांमुळे रिझवान खान याचा झालेला मृत्यू

**(२) ६५४७३ (१६-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील जे.जे. मार्गावरील खड्ड्यांमुळे रिझवान खान या मोटारसायकल स्वाराचा दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ वा त्या सुमारास जागीच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जे.जे. मार्गावरील खड्ड्यांची डागडूजी करण्याची बाब जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणूनही तेथील रस्त्याची डागडूजी केलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) जे. जे. मार्गावरील अपघातस्थळी महानगर टेलिफोन निगम लि. चे चेंबर कव्हर (झाकण) दबलेल्या अवस्थेत होते. या दबलेल्या अवस्थेतील झाकणावरुन मोटारसायकल अतिवेगाने चालवल्यामुळे रिझवान खान या मोटारसायकल स्वाराचा दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी मृत्यु झाला.
(२) सदर जे. जे. मार्ग हा सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता असल्यामुळे सदर रस्त्यावर खड्डे असल्याची बाब खरी नाही.
(३) सदर बाबतीत महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) सदर जे. जे. मार्ग हा सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता असल्यामुळे त्या रस्त्यावर खड्डे नाहीत.
तथापि, अपघात स्थळावरील दबलेल्या चेंबरची दुरुस्ती महानगर टेलिफोन निगम लि. यांचेमार्फत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई अग्निशमन दलातील भरती प्रक्रियेत २०० उमेदवार जखमी झाल्याबाबत

**(३) ६५९१९ (०७-०२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलाच्या बोरीवली भरती केंद्रात २० फूटावरुन उडी मारताना सुमारे दोनशेच्यावर उमेदवारांना फ्रॅक्चर झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदर भरतीत जखमी झालेल्या उमेदवारांवर औषधोपचार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

मुंबई अग्निशमन दलाच्या बोरीवली भरती केंद्रातील भरती प्रक्रियेत विविध प्रवर्गातील एकूण १४,९१२ उमेदवारांनी भाग घेतला होता, त्यापैकी २७ उमेदवारांच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे रुग्णालयाच्या अहवालावरुन निदर्शनास आले.

(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, भरती प्रक्रियेतील उमेदवाराने उडी मारतेवेळी मार लागण्याचे मुख्य कारण हे त्या उमेदवाराने उडी कशा प्रकारे मारावी याबाबत देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करणे आणि घाबरणे हे आहे.

(३) सदर भरतीत जखमी झालेल्या उमेदवारांना औषधोपचार करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या :-

• ज्या उमेदवारांना मार लागला होता अशा उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी तैनात वैद्यकीय अधिकारी व सहाय्यक यांच्याद्वारे प्रथमोपचार किंवा उपचार करण्यात आले.
• अधिकतम खबरदारी म्हणून अग्निशमन दलाच्या तसेच शासन व आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या रुग्णवाहिका, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासह कार्यरत होते.
• जखमी उमेदवारांना त्वरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली येथे पाठविण्यात आले होते.
• उमेदवारांना रुग्णालयात दाखल करण्याच्या प्रक्रियेत अडथळा येऊ नये म्हणून मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी सदर ठिकाणी तैनात करण्यात आले होते.
• यापुढे असे अपघात टाळण्यासाठी, अग्निशमन दलामध्ये भरती प्रक्रियेपूर्वी उमेदवारांना उडी मारण्याचे प्रशिक्षण देण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मैदाने खाजगी संस्थांना देण्याचा निर्णय

**(४) ६५९२३ (०७-०२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),**

वि.स. ३०१ (4)

**श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मैदाने सर्वसामान्य नागरीकांना खुली करुन देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी २१६ भूखंड ताब्यात घेण्याचे मुंबई महापालिकेस आदेश दिले असतानाही महापालिकेने ताब्यात घेतलेले १२८ भूखंड पुन्हा खासगी संस्थांना हस्तांतरित करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड खासगी संस्थांना दिल्याने त्यांचा गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महापालिकेने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाचे पालन न करण्याची कारणे काय आहेत, तसेच, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणा-या सबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन, उक्त भूखंड त्वरित ताब्यात घेण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्तक तत्वावर दिलेल्या २१६ भूखंडांपैकी १५८ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून, उर्वरित ५८ भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने कोणत्याही संस्थेस देण्यात आलेली नसून, त्यांचे परिरक्षण सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, उद्याने व मनोरंजन मैदाने यांच्या परिरक्षणासाठीचे तात्पुरते धोरण प्रस्तावित असून, त्यास महानगरपालिकेच्या सुधार समितीने डिसेंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. परंतु या तात्पुरत्या धोरणास महानगरपालिकेची अद्यापि मान्यता मिळालेली नाही.

**प्रस्तावित तात्पुरते परिरक्षण धोरण :-**

• सदर कालावधी दत्तक तत्त्वावर मानण्यात येणार नाही.

• सदर व्यवस्था ११ महिने किंवा दत्तक धोरणाला मान्यता मिळेपर्यंत जे अगोदर असेल तेवढ्या कालावधीसाठी राहील.

• त्याअंतर्गत भूखंड ११ महिन्यांसाठी केवळ परिरक्षणाकरीता संस्थांच्या ताब्यात देण्यात येतील.

• परिरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या भूभागांवर सर्वसामान्य नागरीकांना प्रवेश व सर्व सोयी सुविधा नि:शुल्क देणे बंधनकारक असेल.

उद्याने व मनोरंजन मैदाने दत्तक तत्त्वावर देण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत सर्वंकष विचार करुन पुनर्विलोकित करण्यात येत आहे.

___

### मुंबईतील प्रत्येक मैदानावर हेलिपॅड विकसित करण्याबाबत

**(५) ६७८१७ (१३-०२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतुकीच्या कोंडीमुळे रुग्णवाहिका, पोलिस आणि अग्निशमन दलाची वाहने अडकून पडत असुन रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याने शहरातील प्रत्येक मैदानावर हेलिपॅड विकसित करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांवर हेलिपॅड विकसित करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बल्लारपूर पेपर मिल (बिल्ट) (जि.चंद्रपूर) कंपनीचे उत्पादन बंद असल्याबाबत

**(६) ६९७९२ (१६-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर पेपर मिल (बिल्ट) (जि.चंद्रपूर) कंपनीचे उत्पादन माहे ऑगस्ट, २०१६ च्या शेवटच्या आठवडयापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिल बंद असल्यामुळे कर्मचा-यांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मिल बंद असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर मिल पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०५-२०१७) :**(१) बल्लारपूर पेपर मिल (बिल्ट) जि.चंद्रपूर या कारखान्यात माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये १५ दिवस व माहे ऑक्टोंबर,२०१६ मध्ये २२ दिवस उत्पादन सुरु होते. त्यानंतर माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१६ मध्ये कारखान्याचे उत्पादन पूर्णपणे बंद होते. तथापि, दिनांक ६/२/२०१७ पासून कारखान्याचे उत्पादन पूर्ववत सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे.

(२) कारखाना बंदच्या कालावधीत कोणत्याही कामगारांस कामावरुन कमी न करता कामगारांना कारखान्यातील परिक्षणाची (maintenance) कामे देण्यात आली होती, हे खरे आहे.

(३) आर्थिक अडचणीच्या कारणास्तव कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया वर नमुद केलेल्या कालावधीत बंद होती.

(४) कारखाना पूर्ववत सुरु होवून कामगारांना थकीत वेतन देण्याची कार्यवाही सत्वर होण्यासाठी व्यवस्थापन व कामगार प्रतिनिधी यांची मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/११/२०१६ रोजी बैठक आयोजित केली होती. तसेच सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांचे मार्फत दिनांक २९/११/२०१६ दिनांक २२/१२/२०१६ व दिनांक १३/१/२०१७ रोजी बैठका घेण्यात आल्या असून कारखान्याचे उत्पादन दिनांक ६/२/२०१७ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

तसेच शासनस्तरावर दिनांक ६/३/२०१७ रोजी बैठक आयोजित करुन कारखाना पूर्ववत सुरु करण्यासाठी व्यवस्थापनाने उपलब्ध केलेल्या निधीतून कामगारांचे थकीत वेतन त्वरीत अदा करण्याच्या सूचना व्यवस्थापनास देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत**

**(७) ७००११ (१६-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नुकतेच गृहनिर्माण धोरण जाहिर केले असून यामध्ये म्हाडाच्या संक्रमण शिबिरात अवैध प्रवेश करणाऱ्या लोकांना घरे देण्यात येणार आहेत परंतु अनेक वर्षापासुन हक्काच्या घरांची मागणी करणाऱ्या म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना डावलण्यात आले असुन त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मालकी हक्काच्या घरांची मागणी करणाऱ्या म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०६-२०१७) :**(१) व (२) दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी जाहीर केलेल्या गृहनिर्माण धोरणास अनुसरुन म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील मुळ भाडेकरुंना पुनर्विकासामध्ये आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन सदनिका देणे तसेच संक्रमण शिबीरातील अनधिकृत रहिवाशांना सदनिका देण्यासंदर्भात धोरण ठरविण्याकरीता गृहनिर्माण विभागाच्या दिनांक ९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून अद्याप याबाबत धोरण निश्चित झालेले नाही.

म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना हक्काची घरे देणेबाबत म्हाडामधील कर्मचारी संघटनेकडून म्हाडाकडे निवेदने प्राप्त झालेली असून म्हाडास्तरावर दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी यासंदर्भात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील महापालिकेच्या शाळांच्या आवारात पानांची गादी टाकण्यात आल्याबाबत**

**(८) ७०४९३ (१६-१२-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महापालिकेच्या बऱ्याच शाळांच्या आवारात पानांची गादी टाकण्यात आली असल्याने विद्यार्थी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या पानांच्या गादीवर मिळणाऱ्या सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थांकडे आकर्षित होत असल्याची बाब दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांच्या परिसरात सर्रास तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असून मुंबई महापालिकेच्या नियमांना केराची टोपली दाखविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियमाची पायमल्ली करणाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिक्षेत्रात तंबाखू व तंबाखू उत्पादनांच्या विक्रीबाबत व १८ वर्षांखालील व्यक्तीस विक्री करण्याच्या बंदीबाबत सर्व संबंधित शाळांना सन २०१२ मध्ये महानगरपालिकेमार्फत आदेश देण्यात आले आहेत.

सर्व मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या सभा घेऊन सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील मानपाडा रोड येथील**
**डी-मार्ट मॉल बेकायदेशीर असल्याबाबत**

**(९) ७०५६३ (१६-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महापालिका हद्दीतील शनी मंदिर समोरील मानपाडा रोड येथील डी-मार्ट मॉल बेकायदेशीर असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर मॉलची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महापालिका यांच्याकडे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार बेकायदेशीर डी-मार्ट मॉलवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही,
तथापि या संदर्भात काही सामाजिक संस्थांच्या तक्रारी माहे जानेवारी ते मार्च, २०१६ या दरम्यान महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या.
(३) सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाने सदर बांधकामाबाबत पुढील सुनावणीपर्यंत “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील भंगार बाजार अन्यत्र हटविणेबाबत**

**(१०) ७०६९० (१६-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहर स्मार्ट सिटी करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये मंजुरी देण्यात आली असुन विकास आराखडा तयार करण्याचे काम देखील सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरातील औद्योगिक वसाहतीमध्ये असलेला भंगार बाजार हा अन्यत्र हटविण्यात यावा अशा प्रकारची मागणी सातत्याने केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहर स्मार्ट सिटी विकास आराखडयामध्ये सदरचा भंगार बाजार शहराबाहेर हटविण्यात यावा व त्यास सर्व सोयीसुविधांयुक्त जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी देखील लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :**(१) नाशिक शहराचा विकास आराखडा आणि विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१७ ही दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेली आहे.
(२) होय.
(३) सदरचा भंगार बाजार शहराबाहेर हटविण्याची मा.लोकप्रतिनिधी व नागरीकांची मागणी होती.

(४) सदर भंगार बाजार महानगरपालिकेमार्फत दिनांक ६.१.२०१७ ते १०.१.२०१७ या कालावधीत हटविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथे सिडको मूळ घरधारकाच्या अनुपस्थितीत घर भूखंड हस्तांतरण प्रक्रिया केल्याबाबत**

**(११) ७०७१९ (१६-१२-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथे सिडको मूळ घरधारकाच्या अनुपस्थितीतील घर भूखंड हस्तांतरण प्रक्रिया मुख्य प्रशासनाच्या स्वाक्षरीनंतर आता विधी सल्लागार यांच्याकडे कायदेशीर अभिप्रायासाठी देण्यात आली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको प्रशासनाच्या वतीने योजना क्र १ ते ४ मधील अनेक मूळ घरधारकांनी हे मुद्रांकाच्या सहाय्याने अनेकांना घरे विकले असून मूळ दस्तावेज नसल्याने मुद्रांकाच्या सहाय्याने ती घेतले असल्याचे सिडको प्रशासनाने मूळ घरधारकांच्या उपस्थितीत हस्तांतरण प्रक्रीया करावी अशी मागणी अनेक संघटनांसह अनेक घर व भूखंड धारकांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने निर्णय घेऊन मूळ घरधारकांच्या उपस्थितीत घरभूखंड हस्तांतरण प्रक्रीया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१७) :**(१) व (२) होय.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयातील मे.सुरज लॅम्प अँड इंडस्ट्रीज विरुध्द हरियाणा राज्य या प्रकरणात भाडेपट्टयाने दिलेली मालमत्ता मूळ मालकाच्या अनुपस्थितीत हस्तांतरीत करता येत नाही असा निर्णय दिला आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयासमोरील विशेष अनुमती याचिका सीसी क्र.५८०४/२००९ व १३९१७/२००९ मधील अनुक्रमे दि.१५.५.२००९ व दि.११.१०.२०११ च्या आदेशान्वये नोंदणीकृत दस्तांशिवाय मालमत्तांचे हस्तांतरण करता येणार नाही हे स्पष्ट केले आहे.

सबब, मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ व नोंदणी अधिनियम, १९०८ च्या तरतूदी आणि मा.सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्णय लक्षात घेता मूळ मालकांचे अनुपस्थितीत व अनोंदणीकृत दस्तऐवजाच्या आधारे सिडको प्रशासनाला घरे / भूखंड मालमत्तांचे हस्तांतरण करता येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजगुरुनगर नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी नियुक्तीच्या आकृतिबंधाबाबत**

**(१२) ७१२२८ (१६-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४ मध्ये १०१ ग्रामपंचायतींचे नगरपरिषदांमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अस्तित्वात आलेल्या राजगुरुनगर नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबतचा आकृतिबंध शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आकृतीबंधास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) सदर आकृतिबंधाबाबतची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केतकीपाडा,दहिसर (मुंबई) येथील झोपडपट्टीवासीयांना मुलभूत सुविधा मिळणेबाबत**

**(१३) ७१८२१ (१६-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केतकीपाडा, दहिसर (मुंबई) येथील झोपडपट्टीतील नागरीक रस्ते, वीज,पाणी आदी सुविधांपासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील नागरीकांना मुलभूत सोईसुविधां अभावी अपेष्टा सहन कराव्या लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने नागरीकांना सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) केतकीपाडा, दहिसर येथील नागरिकांना महानगरपालिकेमार्फत रस्ते व पाणी या सुविधा पुरविल्या जातात.

तसेच, सदर परिसरातील नागरिकांना रिलायन्स एनर्जी व टाटा पॉवर लि. कं. यांचेकडून नियमितपणे वीज पुरवठा केला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कश्यपी (जि.नाशिक) धरणासाठी जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या न्याय मागण्या मार्गी लावण्याबाबत**

**(१४) ७१९४६ (१६-०१-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कश्यपी (जि.नाशिक) धरणासाठी सन १९९२ मध्ये जमीन दिलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना नाशिक महापालिकेत नोकरी आणि जमीनीचा मोबदला मिळण्याबाबत इ. मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी स्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी धरणात उड्या घेत जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित असलेल्या न्याय मागण्या मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :**(१) कश्यपी प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी धरणात उड्या घेतल्या ही वस्तुस्थिती आहे.

(२) प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नाशिक महापालिकेत नोकरी मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी प्रस्ताव शासनास सादर केला होता.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७.९.२०१० च्या शासन निर्णयानुसार, प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या या जाहिरात देऊन व त्यांची सेवा प्रवेश अर्हता व गुणवत्ता विचारात घेऊन करणे आवश्यक असल्याने, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस दिनांक १८.३.२०१६ रोजी सूचित करण्यात आले होते.

तद्नंतर सदर प्रश्नाबाबत निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव नगरपरिषदेच्या अग्निशमक दलात कर्मचा-यांची नेमणूक करण्याबाबत**

**(१५) ७१९७८ (१६-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव नगरपरिषदेतील (जि.नाशिक) अग्निशामक केंद्राच्या दलासाठी पूर्ण वेळ कर्मचारी नसल्यामुळे शहरात आग लागल्यास आग विझविण्यासाठी अन्य शहरातून यंत्रणा उपलब्ध करून घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगांव नगरपरिषदेने अग्निशामक केंद्रासाठी पूर्ण वेळ कर्मचारी नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त व संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय यांच्याकडे दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१७) :**(१) होय.

(२) दिनांक २६ मे, २०१५ अन्वये तत्कालीन मुख्याधिकारी यांनी पद मंजुरीबाबतचा प्रस्ताव सादर केला होता.

(३) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश दिनांक १ ऑक्टोंबर २०१३ अन्वये नांदगांव नगरपरिषदेकरिता अग्निशमन विभागासाठी ६ पदे मंजूर करण्यात आली असून नव्याने पदे मंजूरीची आवश्यकता नसल्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बेवारस गुरांच्या समस्येबाबत**

**(१६) ७२३०० (१६-०१-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेवारस गुरांची संख्या गेल्या काही वर्षात वाढली असून या गुरांना कोंडवाड्यात टाकण्यात येत असून त्यांचा मालक कोणीच नसल्यामुळे त्यांना विरार येथील जीवदया संस्थेकडे सोपविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या गुरांना कोंडवाड्यात टाकण्याची जबाबदारी मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४४१ सी ते जी नुसार महापालिकेची असतानाही बेवारस गुरांचे पालन-पोषण करणे महापालिकेचे बंधनकारक कर्तव्य नसल्याने या गुरांचा ताबा जीवदया संस्थेकडे सोपविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बेवारस गुरांचे पालन-पोषण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील बेवारस गुरांना पकडून १० दिवस कोंडवाडयात ठेवण्यात येते. १० दिवसांनंतर या जनावरांवर कोणीही हक्क सांगितला नाही तर सदर जनावरे पुढील देखभालीकरिता श्री मुंबई जीवदया मंडळी या संस्थेच्या ताब्यात देण्यात येतात.

ज्या जनावरांवर हक्क सांगितला जातो त्या जनावरांच्या मालकांवर न्यायालयात खटला दाखल करुन त्यांच्याकडून मुंबई महानगरपालिका १८८८ च्या अधिनियमानुसार दंड आकारण्यात येतो व ती जनावरे पुन्हा त्यांच्या मालकांच्या ताब्यात देण्यात येतात.

सदर जनावरांचे शुल्क पहिल्या दहा दिवसांचे प्रत्येकी रु. १००/- व त्यानंतर प्रत्येक दिवसाला रु. ५/- याप्रमाणे जनावरे कोंडवाडयात असेपर्यंत घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर शहर महानगरपालिकेचा रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बसविण्याचा निर्णय

**(१७) ७२३५७ (१६-०१-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेने रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बसविण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जुलैच्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर शहरातील महानगरपालिका क्षेत्रांतर्गत किती इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बसविण्यत आली वा येत आहे,

(३) असल्यास, ज्या इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम बसविण्यात आली नाही अशा किती इमारतीचे परवानगी रद्द करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१७) :**(१) होय.

नवीन बांधकाम परवाना धारकांना, बांधकाम क्षेत्रानुसार रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बसविण्याकरिता सुरक्षा ठेव जमा करुन घेणेबाबत चंद्रपूर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२८ दिनांक २७/०७/२०१६ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) आतापर्यंत २१ इमारत धारकांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टमचे काम पूर्ण केले असून, माहे सप्टेंबर, २०१६ ते माहे जानेवारी, २०१७ पर्यंत एकूण ८६ इमारत धारकांकडून रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बसविण्याकरिता सुरक्षा ठेव जमा केलेली आहे.

(३) याबाबत महानगरपालिकेने अद्याप कार्यवाही केलेली नसल्याचे, आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

---

### पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठाचे स्वरुप बदलण्याबाबत

**(१८) ७२५१७ (१६-०१-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठाचे स्वरूप आकर्षक करण्यासाठी प्रकल्प आराखडा तयार करण्याचे काम सहा महिन्यांपासून रखडले असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमिअभिलेख विभागाकडून नदीकाठी असलेल्या जमिनींची सीमा, मालकी, पूररेषा, सर्व्हेबाबतची माहिती मिळाली नसल्याने हा आराखडा रखडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) व (२) पुणे शहरातून वाहणा-या मुळा-मुठा नदीकाठ विकसन प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार मे. एच. सी. पी. डिझाईन प्लॅनिंग ॲंड मॅनेजमेंट प्रा. लि. यांची नेमणूक करण्यात आली आहे. तज्ञ सल्लागारांमार्फत नदी विषयक सर्वेक्षणाचे काम सुरु असून, त्यांच्यामार्फत टोपोग्राफिकल सर्वे, एरिया असेसमेंट सर्वे व विविध प्लॅन तयार करण्यात आले आहेत. तसेच नदी काठच्या मोजणीसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विविध विभागांशी समन्वय सुरु आहे.

भूमिअभिलेख विभागाकडून नद्यांची हद्द निश्चितीसाठी मोजणीचे काम सुरु असून याबाबतचा अहवाल सदर विभागाकडून तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात डेंगू आजाराचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१९) ७२६५४ (१६-०१-२०१७). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात डेंगू आजाराचे प्रमाण वाढल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दरम्यान महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डेंगू आजारावर नियंत्रण ठेवण्यात महापालिका अयशस्वी होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच डेंगू आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने कोणती उपाययोजना आखली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या किटक प्रतिबंधक विभागामार्फत किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करण्यात येतात. याकरीता पुरेसा कर्मचारीवृंद उपलब्ध केलेला असून पुरेसा औषध साठा उपलब्ध करून घेतला आहे. तसेच सदरची औषधे क्षेत्रीय कार्यालयनिहाय योग्य पध्दतीने वाटप सुरू आहे. जुलै महिन्यामध्ये डेंगू प्रतिरोध महिना म्हणून साजरा केला जातो. त्यामधून डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी योग्य असे प्रबोधन केले जाते. महानगरपालिकेच्या स्तरावर किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मॉस्किटो ॲबेटमेंट कमिटी स्थापन केली आहे. शालेय डेंग्यू आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात नियमितपणे गृहनिर्माण संस्था, गणेश मंडळे यांना किटकजन्य आजारांविषयी काळजी घेण्याचे आव्हान करण्यात येते. विद्यार्थ्यांमधून जनजागृती करण्यात येते. त्यामुळे पुणे शहरात डेंग्यू आजाराचे प्रमाण वाढले आहे अशी वस्तुस्थिती नाही.

---

## जालना जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेच्या अवैध अर्जांची विक्री करण्यात आल्याबाबत

**(२०) ७२८७९ (१६-०१-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेच्या अवैध अर्जांची विक्री करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेसाठी इच्छुक लाभार्थ्यांना कोणताही अर्ज करण्याची आवश्यकता नसताना देखील अर्जाची विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०४-२०१७) :**(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे- २०२२ या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ९ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णय निर्गमित करण्यात आला अहे. त्यानुसार सदर योजना ४ घटकात राबविण्यात येत असून घटकनिहाय लाभार्थी निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने PMAY या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज संबंधित अंमलबजावणी यंत्रणाना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर अर्जावरुन लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करुन लाभार्थ्यांची यादी केंद्र शासनाच्या MIS प्रणालीवर नोंदविणे आवश्यक असल्याने अर्जांची (Hard Copy) विक्री करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) हे खरे नाही.

जालना नगरपरिषद अंतर्गत MIS प्रणालीवर दिनांक १३.२.२०१७ अखरे ९४९६ अर्जांची नोंद झालेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा शहरातील जीर्ण पाईपलाईन बदलून नागरिकांना शुद्ध पाणी पुरविणेबाबत

**(२१) ७२९६३ (१६-०१-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरात (जि.भंडारा) पाणी पुरवठा करण्यासाठी मोठी पाईप लाईन टाकण्यात आली असुन सदर पाईप लाईन नाले, गटारे व शोचालयांना भेदून आलेली असून जीर्ण सुद्धा झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईप लाईनद्वारे घाण व अळीयुक्त दुषीत पाणी पुरविल्या जात असल्याची तक्रार नागरिकांनी वारंवार नगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जीर्ण झालेली पाईपलाईन तातडीने बदलून नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :**(१) व (२) भंडारा शहरात पाणी पुरवठा करणारी वितरण नलिका जुनी आहे हे खरे आहे. तसेच या अनुषंगाने दुषित पाणी पुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारी केल्या जातात.
(३) नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर लगेचच किंवा वितरण नलिकेत दोष निर्माण झाल्यास नगरपरिषदेमार्फत तातडीने उपाययोजना करुन दुरुस्ती केली जाते.

नगरपरिषदेमार्फत पाणी शुध्दीकरणाच्या उपाययोजना राबविण्यात येवून नियमित जिल्हा प्रयोग शाळेमध्ये पुरवठा करण्यात येणा-या पाण्याचे नमुने तपासण्यात येतात. तसेच गळती शोधुन नागरीकांच्या तक्रारी निवारणाकरीता पाणी पुरवठयाची नियमित तपासणी नगरपरिषदेमार्फत केली जाते. भंडारा नगरपरिषदेतर्फे वाढीव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सुधारणात्मक कामे करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे शहरात पीएमपी महसुलासाठी आयुर्मान संपलेल्या गाड्या मार्गावर सोडत असल्याबाबत

**(२२) ७३९४७ (२१-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात पीएमपी महसुलासाठी आयुर्मान संपलेल्या गाड्या मार्गावर सोडल्या जात असल्याने शहरात महिन्याभरात पीएमपीच्या चार बसेसने मार्गावर असतांना पेट घेतला असून पीएमपी गाड्यांच्या अपघातांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे तसेच दिवसभरात अडीचशे बस मार्गावर असतांना बंद पडत असल्याचीही गंभीर स्थिती माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुर्मान संपलेल्या गाड्या मार्गावर पाठवून पीएमपीएल प्रशासन प्रवाश्यांचा जीव धोक्यात घालत असून फक्त महसुलासाठी याकडे दुर्लक्ष करीत असल्याने पीएमपी कामगार संघाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिवहन कार्यालयाने पीएमपी प्रशासनाला दिलेल्या यादीमध्ये पुणे शहरात पंधरा वर्षापेक्षा अधिक आयुर्मान असलेल्या ५०० वाहनांचा समावेश असून त्यात सीएनजी १०० गाड्यांचा समावेश आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाब दररोज हजारोंच्या संखेने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या दृष्टीने घातक असून या संदर्भात शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) ऑगस्ट, २०१६ पासून जानेवारी, २०१७ पर्यंतच्या कालावधीत पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मालकीची एक बस व ठेकेदाराकडून भाडेतत्वावर घेतलेल्या तीन बसेसने पेट घेतलेला होता, ही वस्तुस्थिती आहे.

सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत चालविण्यात येणाऱ्या बसेसपैकी ३२४ बसेसचे आयुर्मान संपले असून त्यापैकी ११ बसेस १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या आहेत.

पुणे महानगर परिवहन महामंडळाने आयुर्मान संपलेल्या बसेस टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे नियोजन केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील बी.डी.डी.चाळींच्या पुनर्विकासाबाबत**

**(२३) ७४०१२ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी, नायगांव, शिवडी आणि ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासा संदर्भात दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने चाळींचा पुनर्विकास प्रकल्प राबविण्याबाबत म्हाडास मार्गदर्शन करण्याकरिता शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या 'शक्ती प्रदत्त' समितीने केलेल्या शिफारशींचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत विकासकाची नेमणूक करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व पुनर्विकासाचे काम सुरु करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) तसेच मुंबई शहरातील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०६-२०१७) :**(१) गृहनिर्माण विभागाच्या दि. ३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये अनुक्रमांक ३ व ४ मध्ये अनुक्रमे "शक्ती प्रदत्त" समिती व म्हाडाच्या कार्यकक्षा नमूद केल्या आहे, सोबत आदेश जोडला असून कार्यकक्षा अधोरेखीत केल्या आहेत. कार्यकक्षेच्या अनुषंगाने म्हाडामार्फत बी.डी.डी. पुनर्विकासासंबंधित शक्ती प्रदत्त समिती समोर सादर केलेल्या प्रस्तावांना / शिफारशींना मान्यता / मंजूरी प्रदान करणे अशा प्रकारचे स्वरुप हे समितीचे आहे.

त्यानुसार आजमितीस खालील बाबतीत शक्ती प्रदत्त समितीने मान्यता दिल्या आहेत.

अ) वरळी, नायगाव व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी पुनर्विकास प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ तथा सल्लागाराची अंतिम नियुक्ती करणे.

ब) या तिन्ही पुनर्विकास प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ तथा सल्लागार यांनी तयार केलेला मास्टर प्लॅन अंतिम करणे.

क) नायगाव व ना. म. जोशी मार्ग येथील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामासाठी ठेकेदारांची नियुक्ती करण्याबाबत म्हाडाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देणे.

(२) अ) नायगाव व ना. म. जोशी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी बांधकाम ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे व दि. २१.०४.२०१७ रोजी मे. एल अ‍ॅण्ड टी. लि. व मे. शापूरजी पालोनजी लि. यांनी प्रकल्प बांधकामाचे कार्यादेश जारी केले आहेत.

ब) वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत जागतिक निविदा जाहिरात दि. ०३.०४.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मुंबई शहरातील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर शहरातील कचरा उचलण्याकरिता सक्षम यंत्रणा महापालिकेकडे नसल्याबाबत**

**(२४) ७४७८२ (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील दररोज १७० टनाहून अधिक जमा होत असलेला कचरा उचलण्याकरिता सक्षम यंत्रणा महापालिकेकडे नसल्याने शहरात कच-यांचे डोंगर वाढत असून कोंडाळयातील कचरा पेटविण्याचे प्रकारही वाढले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कच-यांच्या दुर्गधीमुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचराप्रश्नी तोडगा काढण्यासाठी शासनाने निरी अहवालाच्या अंमलबजावणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७) :**(१) हे अंशत खरे आहे.

कोल्हापुर शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणारा घन कचरा संकलन व वाहतुक करण्याकरीता १४ रिफ्युज कॉम्प्यॅक्टर, १०५० स्टील कंटेनर, ५१० सायकल रिक्षा व १८६० प्लास्टिक ड्रम अशी यंत्र सामुग्री महानगरपालिकेने खरेदी केली असुन सध्या या यंत्रणेमार्फत शहरातील कचरा उचलण्याचे काम नियमित सुरू आहे.

कोंडाळ्यामधील कचरा पेटवण्याचे कोणतेही प्रकार केले जात नाहीत.

(२) हे खरे नाही.

कोल्हापुर महानगरपालिकेच्या कसबा बावडा या साईटवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये म्हणुन नियमित किटकनाशकांची फवारणी व जैविक कल्चरचा वापर करण्यात येतो.

(३) कोल्हापुर महानगरपालिकेच्या संपूर्ण घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता टाटा कन्सलटींग इंजिनियर्स लिमिटेड, मुंबई यांची नेमणूक करण्यात आली असुन या संस्थेमार्फत प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर या अहवालाची तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व निरी संस्थेमार्फत करण्यात येणार असुन त्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) येथे सन २००३ पासून झालेली सर्व बेकायदा बांधकामे तोडून टाकण्याबाबत**

**(२५) ७४९७७ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान (जि.रायगड) येथे सन २००३ पासून झालेली सर्व बेकायदा बांधकामे तोडून टाकण्याचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या बेकायदा बांधकामांसाठी अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन प्रथम त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी माजी नगराध्यक्ष यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीनुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
माथेरान नगरपरिषदेमार्फत दि. ०७/०२/२०१७ ते दि. १२/०२/२०१७ दरम्यान पोलिस बंदोबस्तामध्ये अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) माथेरान नगरपरिषद तसेच जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे लेखी स्वरुपात अशाप्रकारचा कोणताही अर्ज प्राप्त झालेला नाही तथापि याबाबत जिल्हाधिकारी रायगड यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील खाडी किनारी व सागरी नियमन क्षेत्रातील इमारतींना सिडकोने व नवीमुंबई महानगरपालिकेने नियमाबाह्य भोगवटा प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(२६) ७५३६१ (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खाडी किनारी व सागरी नियमन क्षेत्राच्या (सीआरझेड) नियमांमध्ये येत असलेल्या नवी मुंबई, पनवेल, खारघर व पाम बीच मार्गासह अन्यत्र खाडी किनाऱ्यावर उभारण्यात आलेल्या गगनचुंबी इमारतींना सिडकोने व नवीमुंबई महानगरपालिकेने नियमबाह्य भोगवटा प्रमाणपत्र दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामे वाचविण्यासाठी शासनाने महाराष्ट्र सागरी क्षेत्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाची परवानगी देऊन भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सागरी नियमन क्षेत्राच्या नियमांचे उल्लंघन करुन बांधकामांना परवानगी देणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका व सिडको प्रशासनातील जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) व (२) अशी बाब नाही.

शासनाकडून महाराष्ट्र सागरी क्षेत्र किनारा व्यवस्थापनाची परवानगी घेऊन भोगवटा प्रमाणपत्रे देण्यात आलेली नाहीत.

(३) व (४) सीआरझेड क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटी (MCZMA) ची नियमानुसार आवश्यक ती पूर्वसंमती न घेतल्याच्या कारणास्तव इमारतींच्या बांधकाम प्रस्तावास MCZMA ने कार्योत्तर मंजूरी देण्यास नकार दिल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्रे दिलेली नाहीत. सदर प्रकल्पांना कार्योत्तर संमती देण्यासंदर्भात एक सविस्तर प्रस्ताव दिनांक २८.६.२०१३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासन व पर्यावरण व वनमंत्रालयास सादर केलेला आहे. सदर पत्रात महानगरपालिकेने संबंधित प्रकल्पांविषयी MCZMA ची पूर्व संमती न घेण्याची विशद केलेली कारणे पहात सीआरझेड क्षेत्रात मोडणाऱ्या भूखंडाचा तपशील स्पष्टपणे दिसेल अशा योग्य प्रमाणाचे कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनचे नकाशे महानगरपालिकेकडे दिनांक १०-२-२०११ नंतरच उपलब्ध होणे हे एक प्रमुख कारण असल्याने महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून प्रस्तुत प्रकरणी पुढील निदेश अद्यापी प्राप्त झालेले नाहीत. ते प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे पुढील कार्यवाही करणेत येईल.

---

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुदान घेऊनही शौचालय न बांधणे तसेच शौचालयांची झालेली दुरवस्था

**(२७) ७६८०४ (२०-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ७०८ लाभार्थींनी अनुदान घेऊनही शौचालय न बांधता त्या पैशांच्या वापर इतर कामांसाठी केल्याचे दिनांक ०५ डिसेंबर, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत अभियानांर्तगत पाहणी दौरा करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या समितीने येथील शौचालयाच्या दुरवस्थेवर ठपका ठेवला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीने विविध ठिकाणी शौचालयांच्या केलेल्या पाहणीत तेथे वीज,पाणी नसणे, दरवाजा नसणे, भितींना गेलेले तडे, तुटलेल्या सीटस, याशिवाय ड्रेनेजची व्यवस्था नसणे इत्यादी बाबी आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनुदानाचा गैरवापर करणाऱ्यांना नोटीसेस बजावण्या पलीकडे कोणतीही दंडात्मक कारवाई अद्याप झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून शहरात सुमारे ३५० सार्वजनिक शौचालयाची व एमएमआरडीने बांधलेल्या १६० शौचालयाच्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही तथा कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :**(१) होय.
स्वच्छ भारत अभियानांतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ६२२ लाभार्थ्यांनी शौचालय बांधकामासाठीच्या पहिल्या हप्त्याचे अनुदान घेऊनही शौचालयाचे बांधकाम सुरु केले नव्हते, ही बाब खरी आहे.
(२) व (३) स्वच्छ सर्वेक्षण, २०१७ अंतर्गत कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया या समितीद्वारे ७ जानेवारी, २०१७ ते ९ जानेवारी, २०१७ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्वच्छतेबाबत सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणानुसार उल्हासनगर महानगरपालिकेस एकूण २००० गुणांपैकी ९७४ गुण प्राप्त झाले असून देशातील स्वच्छ शहरांच्या यादीत २०७ वा क्रमांक मिळाला आहे.
कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया या समितीने पाहणी करुन दिलेल्या सुचनांनुसार शौचालयांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) स्वच्छ भारत अभियानांतर्गत ज्या ६२२ लाभार्थ्यांनी पहिल्या हप्त्याचे अनुदान घेऊनही शौचालयाचे बांधकाम सुरु केले नव्हते, त्यापैकी ७३ लाभार्थ्यांनी शौचालयाचे बांधकाम पूर्ण करुन शौचालयाचा वापर सुरु केला आहे. ४३० लाभार्थ्यांनी वैयक्तिक अडचणीमुळे अथवा घरात पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने उपलब्ध करुन देण्यात आलेले अनुदान उल्हासनगर महानगरपालिकेस परत केले आहे. उर्वरित ज्या ११९ लाभार्थ्यांनी शौचालयाचे बांधकाम सुरु केले नाही, त्यांना पोलिस प्रशासनाच्या मदतीने समज देण्यात येत आहे.
(५) शहरातील सार्वजनिक व एम एम आर डी ए ने बांधलेल्या शौचालयाच्या दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया पुर्ण करुन निविदाधारकास कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदर दुरुस्तीची कामे प्रगती पथावर आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचवटी आणि नाशिक शहराला जोडणारा अहिल्याबाई होळकर पूल मोडकळीस आल्याबाबत**

**(२८) ७८७०६ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचवटी आणि नाशिक शहराला जोडणारा १२२ वर्षे जुना अहिल्याबाई होळकर हा ऐतिहासिक पूल मोडकळीस आला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाने या पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त पूलाच्या दुरुस्तीसाठी किंवा सदर पूलाच्या ठिकाणी नविन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सदर पुल हा दुपदरी वाहतुकीचा आर्चटाईप दगडी बांधकामाचा असून, सुस्थितीत आहे.

(२) सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्याचे प्रस्तावित आहे.

(३) अहिल्याबाई होळकर पुलावरील वाहतुक कमी करण्यासाठी सन २००३ मध्ये सदर पुलालगत पश्चिम बाजुकडे दुपदरी समांतर पुल बांधण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत दोन्ही पुलावर एकेरी वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेमधील शौचालय**
**अनुदानाच्या नस्ती गहाळ झाल्याबाबत**

**(२९) ७९२३६ (२१-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेमधील शौचालय अनुदानाच्या नस्ती गहाळ झाल्याची घटना घडल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीतून काय निष्पण्ण झाले, त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेतील शौचालय अनुदानाची नस्ती गहाळ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच लाभार्थीकडुन याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे डंपिंग यार्ड तयार करण्याबाबत**

**(३०) ७९३३० (२१-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास योजना करतेवेळी नागरी वस्तीपासून सुयोग्य ठिकाणी डंम्पीग यार्ड करण्याबाबत मा.राज्यमंत्री, नगरविकास यांच्याकडे दिनांक ६ एप्रिल, २०१६ राजी बैठक झाली असता त्यात मौजे खडगाव किंवा इतर ठिकाणी लिज संपलेल्या शासकीय खदानीवर डंपिंग यार्ड करावे अशा सुचना लोकप्रतिनिधींनी केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी नागपूर महानगरपालिका, निरी, एम.एस.इ.बी. यांनी अभ्यास करून डंपिंग यार्डचा प्रस्ताव सादर करावा अशा सुचना केल्या होत्या,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथे डंपिंग यार्ड तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांनी दिनांक ०६/०४/२०१६ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे मौजे खडगाव किंवा इतर ठिकाणी लिज संपलेल्या शासकीय खदानीवर डंपींग यार्ड करावे अशी सूचना मा.आमदार महोदयांनी केली व त्यावर मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**धुळे जिल्हयातील पाणी योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) ७९३३७ (२१-०४-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील पाणी योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतचा पलांडे चौकशीचा अहवाल धुळे महानगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिला नसल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या स्थितीची सद्य:स्थिती जाणून घेण्याकरिता जिल्हा विकास समन्वय आणि सनियंत्रण समितीची सभा झाली असता प्रश्न भाग (१) नुसार गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवल्यानंतर ही योजना धुळे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७)** :(१) • केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत मंजूर धुळे शहर पाणी पुरवठा योजनेची चौकशी करणेबाबत गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाणीपुरवठा विभागामार्फत सूचना दिल्या होत्या.
• त्याअनुषंगाने सदर चौकशी अहवाल धुळे महानगरपालिकेस एप्रिल, २०१६ मध्ये सादर केला आहे.
(२) • आयुक्त, धुळे महानगरपालिका यांनी सदर योजनेचे काम गुणवत्तापूर्णरित्या होण्यासाठी प्रकल्पाचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत विनंती केली होती.
• त्याअनुषंगाने आयुक्त, धुळे महानगरपालिका यांच्या विनंतीनुसार सदर योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हस्तांतरीत केले आहे.
(३) व (४) • सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रकल्पाची विभागीय आयुक्त, नाशिक यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
• विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून प्राप्त चौकशी अहवालानुसार सदर प्रकल्पातील अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**बुलडाणा नगरपरिषदे अंतर्गत वृक्ष लागवड योजनेबाबत**

**(३२) ८००६२ (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा नगरपरिषद अंतर्गत वृक्ष लागवड योजनेत दिनांक ०१ ते ०७ जुलै, २०१६ या कालावधीत १२९३ वृक्षांची लागवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृक्षांच्या संरक्षणासाठी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये १२०० ट्री गार्ड खरेदी करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, लागवड करण्यात आलेल्या वृक्षांपैकी केवळ ३०० झाडे व ट्री गार्डच सद्यस्थितीत अस्तित्वात असल्याची बाब माहे डिसेंबर २०१६ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१७) :**(१) होय
(२) होय
(३) लागवड करण्यात आलेल्या वृक्षापैकी कांही झाडे मोकाट जनावरांनी खराब केली आहेत. आज साधारण १००० झाडे जीवंत आहेत व सदर झाडांच्या संरक्षणासाठी लावण्यात आलेले ट्री गार्ड देखिल अस्तित्वात असल्याचे मुख्याधिकारी यांनी नमूद केले आहे.
(४) या प्रकरणी जिल्हाधिकारी बुलडाणा यांना सविस्तर चौकशी करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडला मोठया प्रमाणात आग लागल्याबाबत**

**(३३) ८०५७० (२१-०४-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडला मोठया प्रमाणात आग लागल्याची घटना दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीही या ठिकाणी आग लागली असून तेथील नागरिकांचे आरोग्य धुरामुळे धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आगीची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार भविष्यात डम्पिंगला आग लागू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७) :**(१) व (२) अंबरनाथ येथील फॅारेस्ट नाका परिसरातील सुमारे ३७,००० चौ.मी. क्षेत्रावरील डंम्पिंग ग्राऊंडमध्ये विविध ठिकाणी विखुरलेल्या साधारणत: ४० चौ.मी. भागामध्ये दि.०२/०१/२०१७ रोजी कचऱ्याच्या ढिगास आग लागण्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि एक तासाच्या कालावधीमध्ये सदरहु आग पूर्णत: विझविण्यात आली. या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात धुराचा त्रास झाला असला तरी त्यमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आशी बाब उद्भवली नाही.
(३) व (४) कचऱ्याच्या ढिगामध्ये मिथेन वायू तयार होऊन आगीच्या घटना घडत असतात व त्यावर वेळीच नियंत्रण केले जाते.

कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषदेमार्फत त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या मौजे चिखलोली येथील जागेवर नव्याने क्षेपणभूमी विकसीत करण्यता येत आहे.

---

**नांदेड महानगरपालिकेतील रिक्त पदांबाबत**

**(३४) ८०७१२ (३०-११-०००२). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेत मागील दीड दशकात आठशेहून अधिक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांवर पात्र व्यक्ती उपलब्ध नसल्याची बाब पुढे करुन महानगरपालिकेत कनिष्ठ कर्मचा-यांना वरचे पदे देण्यात येत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त पदभाराच्या नावाखाली मंजूर नसलेल्या पदावर वर्णी लावण्यात येत असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

आकृतीबंध मंजूर करण्याची प्रक्रिया चालु असल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील महानगरपालिकेने वैयक्तिक शौचालय योजनेंतर्गत बनावट लाभार्थी निवड करून अनुदान वाटप केल्याबाबत**

**(३५) ८०७१८ (२१-०४-२०१७). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महानगरपालिकेने वैयक्तिक शौचालय योजनेंतर्गत बनावट लाभार्थी निवड करून अनुदान वाटप केल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वैयक्तिक शौचालय योजनेंतर्गत संबंधित लाभार्थी प्रक्रियेत घोटाळा झाल्याचे व लाभार्थींच्या जागेवर शौचालय दिसून न आल्याचे आढळले आहे व त्या प्रकरणी शासनाने वा महानगरपालिकेने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

पुणे शहरात वैयक्तिक शौचालय बांधण्याच्या योजनेचे काम १५ क्षेत्रिय कार्यालयामार्फत सुरू असून, लाभार्थी निवड करतांना सहाय्यक आयुक्त, उप अभियंता, वरिष्ठ आरोग्य निरिक्षक यांनी संपूर्ण खातरजमा केल्याशिवाय पुढील कार्यवाही करण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा नगरपालिकेने (जि.अहमदनगर) कोणतीही तांत्रिक व प्रशासकीय मान्यता नसताना नियमबाह्य बांधकाम केल्याबाबत**

**(३६) ८०९३८ (२१-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा नगरपालिकेने (जि.अहमदनगर) कोणतीही तांत्रिक व प्रशासकीय मान्यता नसताना सर्व नियम बाजूला ठेवून कार्यालयासमोरच १० लाख ९३ हजार रुपये खर्चाचे बांधकाम केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम सन १९६५ च्या तरतुदीनूसार नगरपरिषदेचे कोणतेही विकासकाम विना निविदा करता येत नाही असे असतानाही सदरचे काम हे कोणतीही निविदा न काढता मजूर संस्थेमार्फत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे, काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१७) :**(१) व (२) श्रीगोंदा नगरपरिषद कार्यालयासमोरील पेव्हर ब्लॉक, ध्वजस्तंभ, संरक्षण भिंत, उद्यान, इ. कामे तत्का. नगराध्यक्षा यांनी मजूर सहकारी संस्थेकडून करुन घेतलेली आहेत. याबाबतचे एकुण रक्कम रु. १०,९३,३७१/- चे देयक नगरपरिषदेस सादर केलेले आहे.

सदर काम तांत्रीक मान्यता, प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया न करताच करण्यात आले असल्याने कोणतेही देयक अदा केलेले नाही.

(३) व (४) नगरपालिका निधी मधून व अन्य कोणत्याही निधीमधून सदर कामाची देयके अदा न करण्याबाबत मुख्याधिकारी, श्रीगोंदा यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निर्देश दिलेले आहेत व जिल्हाधिकारी कार्यालयाची प्रशासकीय मान्यता न घेता काम पूर्ण केल्यामुळे सदर कामाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येणार नाही असे जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविले आहे.

तसेच तत्का. नगराध्यक्षा यांनी कोणत्या परिस्थितीत नगरपरिषदेच्या जागेवर काम केले याबाबत चौकशी करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अग्निशामक केंद्र उभारण्याबाबत**

**(३७) ८०९४० (२१-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आग प्रतिबंधक सल्लागार समितीच्या निकषांमध्ये एखाद्या शहरासाठी पहिल्या तीन लाख लोकसंख्येसाठी १ केंद्र व नंतरच्या ५० हजार लोकसंख्येसाठी १ याप्रमाणे

अग्निशामक केंद्र असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात ३५ लाख लोकसंख्येसाठी फक्त ३५ अग्निशामक केंद्र आहेत तसेच एकूण ६ केंद्रे नव्याने सुरु करण्याचा प्रस्ताव अनेक वर्षे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच अग्निशामक केंद्रामध्ये फायरफायटर, अधिकारी, नवी अत्याधुनिक वाहने व उपकरणे यांची कमतरता असल्यामुळे अलीकडेच कोंढवा येथील लागलेल्या आगीत ६ कामगारांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नैसर्गिक आपत्तीच्या व त्यातही आगीसारख्या आपत्तीच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठी काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७)** :(१) केंद्र शासनाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या निकषानुसार नागरी भागासाठी प्रती १० चौ.कि.मी. क्षेत्रासाठी एक अग्निशमन केंद्र व ग्रामीण भागासाठी प्रती ५० चौ.कि.मी. क्षेत्रासाठी एक अग्निशमन केंद्र आवश्यक आहे. तसेच प्रत्येकी ५०,००० लोकसंख्येसाठी ०१ अग्निशमन वाहन आवश्यक असून ०३ लाखांपर्यंत ०६ अग्निशमन वाहने असणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एक अग्निशमन वाहन असणे आवश्यक आहे.

(२) सदर प्रश्न पुणे महानगरपालिकेशी संबंधित आहे. पुणे महानगरपालिकेच्या शहराची लोकसंख्या ३३ लाख असून एकूण क्षेत्रफळ २४३ चौ.कि.मी. आहे. पुणे महानगरपालिकेकडे सध्या १३ अग्निशमन कार्यान्वित असून ०२ अग्निशमन केंद्राच्या उभारणीचे काम पूर्णत्तवास आले आहे.

(३) कोंढावा येथील लागलेल्या आगीत ६ कामगाराचा मृत्यू झाला आहे, हे खरे नसून सदरील कामगारांचा मृत्यू हा कुलूप बंद असलेल्या दुकानामध्ये लागलेल्या आगीमुळे मोठ्या प्रमाणावर धूर होऊन गुदमरून झालेला आहे. पुणे महानगरपालिका शहराची लोकसंख्या आणि क्षेत्रफळ पाहता केंद्र शासनाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या निकषानुसार पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन सेवेत कार्यरत असलेले मनुष्यबळ आणि अग्निशमन वाहनांची कमतरता आहे हे अंशतः खरे आहे.

(४) केंद्र शासनाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या निकषानुसार पुणे शहराची एकूण लोकसंख्या व क्षेत्रफळानुसार आवश्यक असणाऱ्या अग्निशमन केंद्राच्या उभारणीसाठी पुणे महानगरपालिकेकडून प्रयत्न सुरू आहे. आगीसारख्या वा अन्य प्रकारच्या मानवनिर्मित आपत्तीची संख्या व त्यापासून होणारे धोके कमी करण्याच्यादृष्टीने नागरिकांमध्ये जनजागृती करणे, आपत्तीच्या धोक्यांपासून स्वत:चे तसेच इतरांचे संरक्षण करण्यासाठी नागरीकांना प्रशिक्षण देण्याचे काम अग्निशमन दलाकडून करण्यात येते. शहरामध्ये अग्निसुरक्षा स्वयंसेवक तयार करून त्यांचा प्रशिक्षण देण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून लवकरच सुरू करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महापालिकेच्या नवीन संकेत स्थळावर मागील सहा महिनापासून माहीती अधिकार कायद्याचा कॉलमच टाकलेला नसल्याबाबत**

**(३८) ८०९४५ (२१-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीती अधिकार कायद्यातील कलम ४ अंतर्गत शासकीय कार्यालयांनी आपल्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक असतानाही पुणे महापालिकेच्या नवीन संकेत स्थळावर मागील सहा महिनापासून माहीती अधिकार कायद्याचा कॉलमच टाकलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने स्मार्ट सिटी योजनेंतर्गत लाखो रुपये खर्चून जुने संकेतस्थळ बंद करून त्या जागी उधळपट्टी करत हे काम एका खाजगी कंपनीला देऊन नवीन संकेतस्थळ लाँच केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्या संकेतस्थळावर ही सर्व माहिती उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबधित दोषी अधिकाऱ्यांवर व कंपनीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

जुने संकेत स्थळ हे जुन्या तंत्रज्ञानावर आधारीत असल्याने पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्प व योजनांबाबत नागरीकाभिमुख माहिती देवाण घेवाण बाबत अनेक अडचणीला समोर जावे लागत होते. तसेच, जुने संकेत स्थळ हे इंग्रजी भाषेत उपलब्ध होते.

पुणे महानगरपालिकेचे संकेत स्थळ व माहिती मराठी भाषेमधून उपलब्ध होण्यासाठी विविध ठिकाणाहून मागणी केली जात असल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ७८ भाषांमध्ये आंतरराष्ट्रीय शहरांच्या संकेत स्थळांच्या दर्जाचे नविन संकेत स्थळ तयार करण्यात आले आहे. त्यासाठी मे, झेंन्सार कंपनीकडून सदरचे नविन संकेत स्थळ विकसित केले आहे.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाची माहिती उपलब्ध करण्याकरीता प्रत्येक विभागासाठी ४० मायक्रोसाइटस विकसन करुन नागरीकांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

सदर संकेतस्थळ ऑक्टोंबर, २०१६ मध्ये कार्यान्वित केले आहे.

नविन संकेतस्थळ विकसित करतांना पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागाच्या जुन्या संकेत स्थळावर उपलब्ध असणारी आवश्यक सर्व माहिती नविन संकेत स्थळावर स्थलांतरीत केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) काळकोई कोंड परिसरातील सबा कॉम्प्लेक्समधील अनधिकृत व वाढीव बांधकाम काढून टाकण्याबाबत**

**(३९) ८१०१७ (२१-०४-२०१७). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) काळकोई कोंड परिसरातील सबा कॉम्प्लेक्समधील अनधिकृत व वाढीव बांधकाम काढून टाकण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी देऊनही दापोली नगरपंचायत सदर बांधकाम हटविण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीने जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाला दुर्लक्षित केल्याने येथील सदनिकाधारकांनी दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी उपोषणाला बसणार असल्याचे त्यांना दिलेल्या निवेदनात उल्लेखित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकाम तात्काळ हटविण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सबंधित सदनिका धारकांनी दि. २६/०१/२०१७ रोजी उपोषण करणार असल्याबाबतचे निवेदन दिले हे खरे आहे. याबाबत पोलीस बंदोबस्त मिळाल्यानंतर अनाधिकृत बांधकाम पाडण्यात येईल असे आश्वासन नगरपालिका प्रशासनामार्फत दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

सदर ठिकाणी अनाधिकृत बांधकाम काढण्याकरीता पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने विलंब झाला होता, परंतू दि. ०२/०२/२०१७ रोजी पोलीस संरक्षण प्राप्त झाल्यानंतर सबा कॉम्प्लेक्स इमारतीमधील वाढीव अनाधिकृत बांधकाम नगरपंचायतीमार्फत काढून टाकण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) महानगरपालिकेच्या अनुदानित कामांतर्गत घरकुल योजनेकरिता म्हाळदे व सायने येथे विदयुत पुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(४०) ८१३८२ (२१-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि. नाशिक) महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात अनुदानित कामे अंतर्गत घरकुल योजनेकरिता म्हाळदे व सायने येथे विदयुत पुरवठा करण्यासाठी ११ के.व्ही.लाईन करिता तरतूद रकमेच्या वापर करण्यात आल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामासाठी काढण्यात आलेले टेंडर बनावट असल्याचा देखील आरोप होत असुन या योजनेतील लाभार्थ्यांकडून नियमानुसार १२ हजार रुपये रक्कम घेणे अपेक्षित आहे मात्र महानगरपालिका २४ हजार रुपये वसूल करीत असुन यामुळे लाभार्थ्यांवर आर्थिक ताण पडत असल्याने शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) :**(१) होय.
(२) घरकुल योजनेकरीता विद्युत पुरवठा करण्यासंदर्भात विद्युत लाईनच्या कामासाठी मालेगाव महानगरपालिकेने नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविली.

सदर योजनेअंतर्गत प्रचलित धोरणानुसार लाभार्थ्यांकडून अंशदानाची रक्कम महानगरपालिकेकडून वसूल करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशीम जिल्यहातील नव्याने स्थापन झालेल्या मालेगांव नगरपंचायतीसाठी पदस्थापनेचा अकृतीबंध शासनाकडून तयार करण्यात आला असल्याबाबत**

**(४१) ८१६७० (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशीम जिल्हयातील नव्याने स्थापन झालेल्या मालेगांव नगरपंचायतीसाठी पदस्थापनेचा आकृतीबंध शासनाकडुन तयार करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव नगरपंचायतसाठी २९ पदाची निर्मीती करण्यात येणार आहे असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१७) :**(१), (२) व (३) राज्यातील तालुका मुख्यालय असलेल्या ग्रामपंचायतींचे नगरपंचायत / नगरपरिषद मध्ये रुपांतर करण्याबाबत घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार रुपांतर करण्यात आलेल्या नगरपंचायतीसाठी नविन पद निर्मिती करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महापालिका रुग्णालयात केसपेपरवर जातीचा रकाना असल्याचे आढळून आल्याबाबत**

**(४२) ८१७४७ (२०-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिका रुग्णालयात रुग्ण तपासणीकरिता देण्यात येणा-या केसपेपरवर जातीचा रकाना असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
दारिद्रय रेषेखालील रुग्णांना शासनाच्या विविध प्रकारच्या योजनांचा लाभ देण्यात येतो. तो लाभ रुग्णांना मिळण्याकरीता केसपेपरवर जातीचा रकाना नमुद करण्यात आला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्हयातील मलकापूर नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहनाच्या दुरुस्तीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

**(४३) ८१९०७ (२१-०४-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील मलकापूर नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहनाच्या दुरुस्तीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी उप संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांना आदेशित केल्याचे दिनांक २१ जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विशेष लेखा परिक्षणास जाणून-बुजून विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,त्यानुसार विशेष लेखा परिक्षणास विलंबाची कारणे काय आहेत व विशेष लेखा परिक्षण कधी पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१७) :**(१) होय.
(२) बुलडाणा जिल्हयातील मलकापूर नगर परिषदेच्या अग्निशमन वाहनाच्या दुरुस्ती प्रक्रीयेत आलेल्या अनियमीततेबाबत विशेष लेखा परिक्षण करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी दिनांक २१.०६.२०१५ रोजी उपसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. उपसंचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण अहवाल अप्राप्त आहे.
(३) उपसंचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखापरीक्षणातील आक्षेपाबाबत जिल्हाधिकारी यांना नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यातील डम्पिंग ग्राऊंड हटविण्याबाबत

**(४४) ८१९६५ (२०-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) डम्पिंग ग्राऊंडच्या विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास जव्हार नगरपरिषदेवर मोर्चा काढून तसेच यापुर्वीदेखील डम्पिंग ग्राऊंड हटविण्याबाबत वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२) जव्हार नगरपरिषदेने आरक्षण क्र. ४९ मध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी आरक्षणात बदल करण्याचे प्रस्तावित केलेले असून त्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे पाठविण्यात आला आहे.आरक्षण बदलाची कार्यवाही झाल्यानंतर सदर जागेत घनकचरा प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रिसोड (जि.वाशिम) येथील नगरपरिषदेद्वारे सुरु असलेल्या बाधंकामामध्ये लघुव्यवसायीकांना गाळे मिळण्याबाबत

**(४५) ८२१३१ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) येथील गजानन टॉकीज व अग्रवाल भवना समोरील स.नं.४६३ मध्ये नगरपरिषदेद्वारे बाधंकाम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व्हे.नं.४६३ मधील जागेवर सुमारे २५ लघु व्यवसायीक ३० वर्षापासुन आपला लघुव्यवसाय करतात, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या लघुव्यवसायीकांनी सन-२०११ मध्ये प्रत्येकी ५००० रु.दंडाच्या रक्कमा नगरपालिकेकडे भरलेल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सुरु असलेल्या बांधकामामध्ये या लघुव्यवसायीकांनी गाळे मिळण्याबाबत दिनांक १६ जून, २०१६ च्या दरम्यान निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) स.नं.४६३ मधील जागेवर काही लोक अतिक्रमण करुन व्यवसाय करीत होते. विषयांकित दुकान केंद्राचे बांधकाम करणेसाठी सदर जागेवरील अतिक्रमणे नगर परिषदेने निष्कासीत केलेली आहेत.

(३) हे खरे आहे.
(४) व (५) विषयांकित दुकान केंद्रातील दुकान गाळे हे म.न.प. अधिनियम १९६५ चे कलम ९२ अन्वये वितरीत करावी लागतात. नगर परिषदेने सदर दुकान गाळे वितरीत करण्याबाबतचे धोरण अद्याप निश्चित केलेले नाही. नगर परिषदेमार्फत या बाबत धोरण निश्चित करुन सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने दुकान गाळे वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाषाण तलाव सुशोभिकरण व परिसरातील पक्षी अभयारण्य विकासाबाबत**

**(४६) ८२२१५ (२१-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरतील पाषाण तलाव परिसरात सर्वत्र असलेली बांधकामे, माणसांची वर्दळ व तलावावर पसरलेली जलपर्णी यामुळे पाषाण तलावाचे सौंदर्य नष्ट होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाषाण तलाव सुशोभिकरण व परिसरातील पक्षी अभयारण्य विकासासाठी महापालिकेस कोट्यवधी रुपये खर्च करूनही येथे पक्षांसाठी पोषक वातावरण तयार करण्यास अपयश आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलावात सर्वत्र जलपर्णी पसरल्यामुळे पक्षांना आकाशातून पाणी दिसत नाही व तलावातील वनस्पती नष्ट झाली आहे त्यामुळे पक्षांना येथे मिळणारे जंतू व कीटक हे खाद्य मिळत नाही व परिसरात वाढलेली झोपडपट्टीतील लोक या पक्षांची शिकार करतात तसेच झाडांची बिनधास्त कत्तल करून झाडीमधून मोठ्या प्रमाणात सरपण संकलित केले जाते याचा फटका या तलावात येणाऱ्या पक्षांना बसत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाषाण तलाव सुशोभिकरण व परिसरातील पक्षी अभयारण्य विकासासाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) पुणे महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजेअंतर्गत तलावाचे सुशोभिकरण करुन वृक्षारोपण केल्याने पक्ष्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या परिसरात पक्ष्यांचा वावर दिसून येत आहे.
(३) व (४) रामनदीतील दूषित पाण्यामुळे सतत जलपर्णी निर्माण होत असते. तथापि, पुणे मनपाच्या आरोग्य विभागाकडून दरवर्षी जलपर्णी काढण्यात येते.

पक्ष्यांना पाण्यातील जंतू व किटक हे खाद्य मिळत नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. तलावाच्या सुशोभिकरणांतर्गत तलावाच्या कडेने संरक्षक भिंत बांधल्याने तलाव परिसरात अतिक्रमण थांबले आहे. नागरिकांच्या सोयीसाठी तलावाच्या एका बाजूस मातीचा जॉगिंग ट्रॅक असून इतर बाजूस डिफेन्स एरिया असल्याने नागरिकांना जाण्यास निर्बंध आहे. तसेच

तलावाच्या मध्यभागी असलेल्या बेटांवर जाण्यास नागरिकांना कोणतीही सुविधा नसल्याने या बेटांवर पक्ष्यांचा वावर आहे. त्यामुळे पक्ष्यांची शिकार होणे, झाडांची कत्तल होणे याबाबी आढळून आलेल्या नाहीत. तसेच पुणे महानगरपालिकेकडून श्वान पथकामार्फत सदर परिसरात वेळोवेळी भटक्या कुत्र्यांवर आळा घालण्याबाबत दक्षता घेण्यात येते.

पाषाण परिसर हा पक्षी अभयारण्य म्हणून घोषित झालेला नाही तथापि, पुणे महानगरपालिकेने जे.एन.एन.यु. आर.अंतर्गत तलावातील गाळ काढणे, काढण्यात आलेल्या गाळावर स्थानिक प्रजातिच्या वृक्षांची लागवड करणे, संगोपन करणे, मध्यभागी पक्षांसाठी बेट तयार करणे, सरंक्षित भिंत बांधणे, बंधा-याचे मजबुतीकरण इ. कामे केलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोर नगरपालिका (जि.पुणे) यांनी चतुर्थ कर आकारणीविरोधात**
**अपिलात जाऊनही समिती स्थापन झाली नसल्याबाबत**

**(४७) ८२३०८ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर नगरपालिका (जि.पुणे) यांनी सन २०१४-१५ मध्ये केलेल्या चतुर्थ कर आकारणीविरोधात अपिलात जाऊनही समिती स्थापन झाली नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपालिकने सन २०१४-१५ या वर्षात भोर शहरातील मिळकत धारकांच्या करात चौपट वाढ केली होती व करण्यात आलेला सर्व्हे चुकीचा झाल्याने अनेकांवर अन्याय झाला असल्याने सदर चुक दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१७) :**(१) व (२) भोर नगरपालिकेने सन २०१४-१५ मध्ये चतुर्थ वार्षिक कर आकारणी विहीत पध्दतीने केलेली असून मिळकत धारकांच्या करात मर्यादेपेक्षा जास्त वाढ केलेली नाही. तसेच सर्व्हे योग्य रितीने केला आहे.

भोर शहरातील मिळकत धारकांच्या करात वाढ केली अशी धारणा झालेल्या मिळकतधारकांसाठी दिनांक २९.१२.२०१४ रोजी करमुल्यनिर्धाण अधिकारी तथा नगररचनाकार, पुणे यांचे समोर सुनावणी घेण्यात आली. तद्‌नंतरही समाधान न झालेल्या मिळकतधारकांच्या तक्रारीसाठी जिल्हाधिकारी पुणे यांनी दिनांक १०.०१.२०१७ रोजी अपिल समिती स्थापन केली. सदर समितीच्या २ बैठका झालेल्या आहेत. तक्रारदारांच्या तक्रारीसंदर्भात प्रत्यक्ष मिळकतीचा सर्व्हे करण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेतील सोलार सिटी योजनेबाबत

**(४८) ८२३८१ (३०-११-०००२). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादचा देशभरात निवडण्यात आलेल्या ६० सोलार सिटिमध्ये सन २०१३ मध्ये समावेश झाला या प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून यापैकी ३५ टक्के वाटा केंद्र शासन उचलणार असून ६५ टक्के वाटा महानगरपालिकेला उचलायचा आहे व ५ वर्षात एकूण वीज वापरापैकी १० टक्के वीज सौर उर्जेतून निर्माण करावी असा सोलार सिटीचा उद्देश आहे.यामुळे शहरी भागाची वाढती विजेची गरज भागवता यावी व शाश्वत वीज मिळून वीज भारनियमन पासून सुटका व्हावी तसेच महानगरपालिकेचा विजबिला पोटी होणारा खर्च कमी होणार आहे व या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे यापैकी ७ लाख ८६ हजार रु.चा निधी ही तीन वर्षापूर्वी देण्यात आला आहे,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय धोरणामुळे प्रकल्पाचा पूर्ण निधी मिळाला नाही तर कन्सल्टंट नेमण्यासाठी ७ लाख रुपये खर्च केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामध्ये अधिकाऱ्यांचे फायदे कमी आणि महानगरपालिकेचा फायदा जास्त असल्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी या योजनेकडे दुर्लक्ष केले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगगरपालिकेचे दरमहा विजबिल ५ कोटी येते व सौर पॅनल लावून वीज निर्मिती झाली असती तर महानगरपालिकेचा कोट्यावधीचा फायदा झाला असता, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, ज्या अधिकाऱ्यामुळे हा प्रकल्प राबविण्यास विलंब झाला त्या सबंधीत अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे. भारतातील एकुण ६० शहरांचा सौर शहर प्रकल्पा अंतर्गत समावेश करण्यात आलेला असुन महाराष्ट्रातुन औरंगाबाद शहरासह एकुण ६ शहरांचा या प्रकल्पा अंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी एम.एन.आर.ई. तर्फे रु.५० लक्षच्या निधीची तरतुद प्रस्तावीत आहे व एकुण रु.७,८६,०००/- चे अनुदान प्राप्त झालेले आहे. सदर अनुदान मास्टर प्लॅन (DPR) तयार करण्यासाठी खर्च करण्यात आलेले आहे.

(३) व (४) केंद्र शासनाकडून विविध चार ऐतिहासिक स्थळे तसेच औरंगाबाद महानगरपालिकेची मुख्य इमारत या ठिकाणी सौर प्रकल्प राबविण्यासाठी निधी मिळण्याकरिता दि.२७/०९/२०१४ रोजी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाकडे रु.३४५.९० लक्षचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीवर ८० किलो वॅट सौर ऊर्जेसाठी (रुफ टॉप) रु.५३,३२,८००/- च्या प्रकल्पास दि.१८/०२/२०१७ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे मासिक वेतन वेळेवर होत नसल्याबाबत**

**(४९) ८२४५४ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे मासिक वेतन सुमारे ४-५ महिन्यांपासून वेळेवर होत नसल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ आली असून त्यांना मासिक वेतन वेळेवर मिळावे यासाठी महानगरपालिका कर्मचारी वर्गाने शासनाकडे व लोकप्रतिनिधींकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये एका निवेदनाने मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाप्रमाणे शासनामार्फत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) :**(१) महानगरपालिका कर्मचारी संघटना व अन्य कामगार संघटना यांचेमार्फत महानगरपालिका कर्मचाऱ्यांची वेतन वेळेवर करण्याबाबत निवेदन सादर केले आहे.

(२) महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास विलंब होत असला तरी, वेतन वेळीच देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक पुलांचे सेफ्टी ऑडीट करण्याबाबत**

**(५०) ८२६७५ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक पुलांचे सेफ्टी ऑडीट करण्याबाबत विभागीय आयुक्तांनी ४ महिन्यांपूर्वीच आदेश देऊनही पुण्यातील तज्ज्ञांना या कामासाठी वेळ मिळत नसल्याने सर्वेक्षणाचे काम संथगतीने सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्ट्रक्चरल आणि सेफ्टी ऑडिटचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय जुन्या पुलांची डागडुजी वा नवीन पूलांची निर्मिती असंभव असल्याचे आणि तोपर्यंत सदर पूलांवरुन ये-जा करणाऱ्या नागरिकांना जीव मूठीत धरुनच रहदारी करावी लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरील ऐतिहासिक पूलांची आवस्था पाहता व वाहतुकीची निकड पाहता पूलांचे संरचनात्मक सर्वेक्षण (Structural Audit) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून करुन घेणे संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेकडून कार्यवाही चालू आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.